
इंडस्ट्रीला अनेक प्रतिभावंत देणारे नासीर हुसेन कालवश

□ अजित पोपट

'ओ हसीना जुल्फों वाली जाने जहां, ढूंढती है कातिल आंखे किस का नशा...' किंवा 'दीवाना मुझ सा नहीं इस अंबर के नीचे, आगे है कातिल मेरा और मैं पीछे पीछे...' ही गाणी म्हणणारा शम्मी कपूर आजही आपल्याला आठवतो तर 'पिया तू अब तो आजा...' आणि 'आजा आजा मैं हूं प्यार तेरा...' ही आशा भोसलेंची आवडती गाणी आहेत. या गाण्याचं समान सूत्र संगीतकार आर. डी. बर्मन एकटेच नसून चित्रपट निर्माते नासीर हुसेनही आहेत.



नासीर हुसेन: जितके यशस्वी तितकेच नम्र

१९५०च्या दशकात नासीर हुसेन आपल्या नशिबावर हवाला ठेवून मुंबईतील चित्रपटसृष्टीत दाखल झाले. त्यांचा जन्म भोपाळचा आणि महाविद्यालयीन शिक्षण लखनौचं. तर कारकीर्दीच्या शोधात ते मुंबईला पोहोचले. फिल्मीस्तानच्या सुबोध मुखर्जी यांच्याबरोबर नासीर हुसेननी सहाय्यक म्हणून काम सुरू केलं. त्यावेळी शम्मी कपूर फ्लॉप हीरो होता. आशा पारेखला विजय भट्टने *गुंज उठी शहनाई*मधून बाजूला केलं होतं. नासीर हुसेन गोष्ट ऐकवण्यात हुशार. त्यांनी रोमँटिक चित्रपटांची व्याख्या बदलणारी दोन स्क्रिप्ट लिहिली होती. *पेईंग गेस्ट* आणि *मुनीमजी*. त्यांच्या या स्क्रिप्टमध्ये शशधर मुखर्जींना दिग्दर्शक दिसला. आणि त्यांनी आपल्या आगामी चित्रपटाच्या दिग्दर्शनाची जबाबदारी नासीरजींवर सोपवली. नासीरने शम्मी कपूर आणि अमिताला साईन केलं. त्यावेळी मुखर्जी चमकले आणि मनाशीच म्हणाले, हा बेटा पहिल्याच प्रयत्नात फसणार बहुतेक! पण त्यांचा अंदाज फसला. *तुमसा नही देखा* सुपरडुपर हिट चित्रपट ठरला. दुसऱ्या चित्रपटात नासीरने शम्मी कपूरबरोबर आशा पारेखला घेतलं. *दिल दे के देखो*मधली ही जोडी नंतर अनेक चित्रपटांत हिट ठरली.

आपल्याला संधी देणाऱ्या शशधर मुखर्जींना नासीर विसरले नाहीत. त्यांनी शशधर यांचा मुलगा जॉयला आशा पारेखबरोबर आपल्या *फिर वही दिल लाया* हूंमध्ये संधी दिली आणि तोही हिट ठरला.

आज त्या दिवसांबद्दल बोलताना शम्मी कपूरचं मन भरून येतं. कारण त्यांनीच शम्मीला खऱ्या अर्थाने हीरोच्या रांगेत बसवलं होतं. त्यांच्या चित्रपटात काही गोष्टी हमखास आढळायच्या नायक-नायिकेपैकी एक श्रीमंत एक गरीब, सिमला किंवा काश्मिरची लोकेशन्स, हीट गीत-संगीत आणि पोपटलाल (राजेंद्रनाथ) ची कॉमेडी. हे बरेचदा समान असूनही चित्रपट हिट ठरायचा. ओ. पी. नय्यर, शंकर-जयकिशन आणि आर. डी. बर्मन हे नासीर हुसेनचे आवडते संगीतकार. त्यांच्या चित्रपटात कथानक फारसं वेगळं नसायचं. तरीही हाताळणी आणि फ्रेश लोकेशन यामुळे दर्शक ते हमखास पसंत करायचे.

एकदा शम्मी कपूर गमतीने त्यांना म्हणाला, नेहमी नेहमी रोमॅण्टिक चित्रपट काय बनवता. एखादा रहस्यपट बनवा. आणि मग शम्मी, आशा आणि प्रेमनाथला घेऊन त्यांनी *तिसरी मंजिल* बनवला. या चित्रपटाने संगीतकार म्हणून आर.डी.बर्मनना चांगला हात दिला. रातोरात ते सुपरहिट संगीतकार झाले. दरम्यान त्यांनी मनमोहन देसाईंच्या लॉस्ट ॲण्ड फाऊंड फॉर्म्युलावर आधारित *यादों की बारात* बनवला. तोही हिट ठरला. *जमाने को दिखाना है* हा त्यांचा पहिला फ्लॉप चित्रपट. आणि त्यानंतर *मंजिल मंजिल, जबरदस्त...* अशी फ्लॉप चित्रपटांची मालिकाच सुरू झाली.

चाळीस-पंचेचाळीस वर्षांच्या कारकीर्दीत नासीर हुसेननी मनोरंजनात्मक चित्रपटांवर भर दिला. उषा खन्ना, विनोदवीर राजेंद्रनाथ, जूही चावला, आणि आजचा *लगान*चा नायक आमिर खान ही नासीरजींची चित्रपटसृष्टीला मोठी देणगी आहे. १९८७-८८ मध्ये त्यांनी आपला मुलगा मन्सूर खान याच्या दिग्दर्शनात *कयामत से कयामत तक* बनवला. आणि आमिर हीरो झाला. त्यानंतर *जो जीता वही सिकंदर* हा आणखी एक हिट चित्रपट त्यांनी दिला. सतत ग्लॅमरस दुनियेत राहून आणि यशाचं शिखर गाठूनही नासीरजी सदैव नम्र राहिले. शम्मी कपूरच्या शब्दांत बोलायचं म्हटलं तर ते शत्रूशीही मित्रासारखं वागत.

१२ मार्च रोजी दुपारी टीव्ही बघता बघता नासीरजींच्या छातीत अचानक दुखायला लागलं आणि ते अल्लाला प्यारे झाले... ●



भाऊ ताहिरबरोबर नासीर



*दिल दे के देखो*मध्ये शम्मी-आशा



*हम किसी से कम नहीं*मध्ये ऋषी-काजल किरण